रविवार नागपूर, २६ नोव्हेंबर २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ



वर्धा : विजेत्या विद्यार्थिनींसोबत प्रशिक्षक.

# मैदानी स्पर्धेत जाजू महाविद्यालयाचे यश

सकाळ वृत्तसेवा

वर्धा, ता. २५ : स्थानिक श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर, विद्यापीठाद्वारे आयोजित वार्षिक मैदानी स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करून पदके प्राप्त केली.

यात शालिनी मोरे, वैशाली लोटे, सोनू लसुंते यांचा समावेश आहे.

यशाबद्दल प्राचार्य डॉ. पी. एस. कालभूत, उपप्राचार्य एस. एम. पवार, डॉ. सुशील चव्हाण आदींनी अभिनंदन केले.

लोकमत शनिवार, दि. २५ नोव्हेंबर २०१७

# श्रीकृष्णदास जाजू महाविद्यालय



वर्धा : श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महा.च्या विद्यार्थिनींनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठद्वारे आयोजित वार्षिक मैदानी स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन केले. यात ४ पदक प्राप्त केले. यात शालिनी मोरे हिने रौप्य पदक (हैमर थ्रो), वैशाली लोटे रौप्य पदक (भाला फेक), सोनू लसुंते कांस्य पदक (हाई जंप) प्राप्त झाले. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. कालभूत, उपप्राचार्य पवार, डॉ. सुशील चौहान यांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

सकाळ नागपूर, सोमवार, २ एप्रिल २०१८



वर्धा : पदकप्राप्त शालिनीसह प्राचार्य आणि प्राध्यापक.

# महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेमध्ये शालिनीला पदक

वर्धा, ता. १ : शिक्षा मंडळाद्वारे संचालित पिपरी (मेघे) येथील श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालयाची विद्यार्थिनी शालिनी देवीदास मोरे हिने खेळाने उत्कृष्ट प्रदर्शन करीत कांस्यपदक प्राप्त केले. या यशाबद्दल शालिनीचे महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक आणि शिक्षेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. तिला क्रीडाशिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले. शालिनीचे या यशाबद्दल सर्व स्तरावरून कौतुक करण्यात येत आहे.

देशोन्नती
बुधवार, दि.७ ऑगस्ट २०१९

# श्रीकृष्णदास जाजू महाविद्यालयाचे तीन विद्यार्थ्यांना विदर्भ केसरी



**प्रतिनिधी / ६ ऑगस्ट**

**वर्धा :** येथील श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालयातील तीन खेळाडू विदर्भ केसरीचे मानकरी ठरले आहे. मीताली उरकुडे हिने ५०कि.वजनगटात, भावना बावणे ५५ वजनगटात, शिवम चौधरी हिने ६५ कि वजनगटात जिल्ह्याच्या संघाची निवड करण्यात आली आहे.पुढील महिन्यात परतवाडा येथे आयोजित विदर्भ केसरी कुस्ती स्पर्धेत हा संघ जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करतील.खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य ,प्राध्यापक ,कर्मचारी,तसेच कर्मचारी वृंद, क्रीडा विभागाचे डॉ.सुशील चौहाण आदींनी कौतूक केले.

# पुण्य नगरी

▮ शनिवार, २५ डिसेंबर २०२१

# In Short

## राज्यस्तरीय लाठी स्पर्धेत साहील तराळे द्वितीय



वर्धा : नुकत्याच सिंहगड कॉलेज, सोलापूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय लाठी स्पर्धेत येथील श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालयाचा विद्यार्थी साहील तराळे याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या यशाबद्दल त्याचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी त्याला भावी जीवनाच्या शुभेच्छा दिल्या. साहील तराळे याने आपल्या यशाचे श्रेय प्रा. अभिजीत पारगावकर, शारीरिक शिक्षण विभागाचे डॉ. सुशील चौहान, उपप्राचार्य डॉ. सुरेश पवार, प्राचार्य डॉ. पी.एम. कालभूत यांच्यासह प्राध्यापक व आई-वडीलांना दिले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पी.बी.बैस तर संचालन डॉ. धनवीज यांनी केले. आभार प्रा. वरफडे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.